# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 22 August 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २२ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

***ठळक बातम्या***

- **सोयाबीन आणि कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा**
- **राज्यातल्या कांदा, कापूस आणि सोयाबीन प्रश्नांसंदर्भात लवकरच दिल्लीत बैठकीचं आयोजन – केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची ग्वाही**
- **महिलांच्या रक्षणासाठी राज्य सरकार सक्षम असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन, तर बदलापूर घटनेच्या निषेधार्थ २४ तारखेला विरोधी पक्षांकडून महाराष्ट्र बंदचं आवाहन**

**आणि**

- **राज्य शासनाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या मराठी चित्रपट पुरस्कारांचं मुंबईत वितरण**

***सविस्तर बातम्या***

सोयाबीन आणि कापसाला हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्यातील ई पिक पाहणीची अट रद्द करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ इथं राज्यस्तरीय कृषि महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते केली. राज्य सरकारने एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून दुप्पट नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेतला, गेल्यावर्षी सोयाबीन, कापूस पिकाला कमी दर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये देण्याचा निर्णय

घेतला, यासाठी आवश्यक ई–पीक पाहणी अहवाल अनेक शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचं निदर्शनास आलं आहे, त्यामुळे आता ई–पीक पाहणी अहवालाची अट शिथिल करून सातबारा उताऱ्यावरील नोंदीनुसार अनुदान वाटप करण्यात येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. शेतकऱ्यांच्या साडे सात अश्वशक्तीच्या कृषीपंपांचं वीज देयक पूर्णपणे माफ करण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

****

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. राज्यातल्या कांदा, कापूस आणि सोयाबीनसंबंधीच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरच नवी दिल्ली इथं बैठक आयोजित केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. विकसित भारताचं स्वप्न विकसित शेतीच्या आधारेच पूर्णत्वास जाऊ शकतं, असं ते म्हणाले. पीक विमा योजनेची प्रलंबित रक्कम लवकरच शेतकऱ्यांना वितरित केली जाईल, असं चौहान यांनी सांगितलं. ते म्हणाले...

> **आज जब मै आ रहा था, तो रास्ते मे किसान उन्होंने मुझे बताया फसल बिमा योजना के पैस नही मिलें। मै आप को आश्वस्त करता हूं, मैने वहीं से फोन किया मेरे अधिकारीयों को। और आप को मै वचन देता हूं, महाराष्ट्र के किसानों के साथ न्याय होगा। फसल बिमा योजना का बचा पैसा पाई पाई दिलवाई जायेगी। किसानों की आय दुगनी करने के लिये हम कोई कसर नही छोडेंगे। हर संभव उपाय करेंगे।**

मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. समुद्रात वाहून जाणारं ५० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची योजना अंतिम टप्प्यात असून बीड जिल्ह्यातल्या आष्टीपर्यंत हे पाणी येईल, असं फडणवीस यांनी सांगितलं.

****

Sमहिलांना सुरक्षा देण्यासाठी राज्यसरकार सक्षम असून, अत्याचार करणाऱ्या आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते काल रत्नागिरीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या मेळाव्यात बोलत होते. बदलापूरच्या घटनेचं राजकारण करणं गैर आहे, मात्र विरोधकांना त्याचा विसर पडला, असं मुख्यमंत्री म्हणाले. बदलापूर रेल्वे स्थानकावर झालेलं आंदोलन हे राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोपही त्यांनी केला.

****

बदलापूरला झालेलं आंदोलन पूर्वनियोजित असण्याच्या शक्यतेची पोलीस पडताळणी करत आहेत, यासंदर्भातले काही फोनकॉल्स आणि व्हाईस रेकॉर्डिंग्स पोलिसांच्या हाती लागली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. याप्रकरणी आतापर्यंत तीनशे जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अडुसष्ट जणांना अटक करण्यात आली आहे. २८ जणांना काल न्यायालयासमोर हजर केलं असता, त्यापैकी २२ जणांना न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, या अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत न्यायालयानं २६ ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे. त्याचं वकीलपत्र घेण्यासही वकिलांनी नकार दिल्याचं वृत्त आहे.

****

बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या विरोधी पक्षांच्या वतीनं येत्या चोवीस तारखेला 'महाराष्ट्र बंद' ची हाक दिली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी ही माहिती दिली.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ आणि राज्य सरकारच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं काल ठिकठिकाणी निदर्शनं करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर तसंच बीड इथं झालेल्या निदर्शनात, आंदोलकांनी बांगड्या फोडून सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

****

राज्यात 'लाडकी बहिणी योजनेपेक्षा सुरक्षित बहीण हवी', या मागणीसाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या आणि युवासेना कार्यकारीणी सदस्यांनी, काल

पोलीस महासंचालक डॉ. रश्मी शुक्ला यांची भेट घेतली. बदलापूर घटनेतल्या आरोपींना कठोर शिक्षेच्या मागणीचं निवेदन यावेळी देण्यात आलं.

****

महिला आणि बालकांवर होणारे अत्याचार रोखण्याच्या दृष्टीनं राज्यातल्या सगळ्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि मुंबई उपनगरमधल्या प्रत्येक महाविद्यालयामध्ये, पुढच्या महिन्यापासून स्व-संरक्षणाचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे. कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी काल मुंबईत एका समारंभात ही माहिती दिली. शाळा आणि महाविद्यालयांमधल्या महिला शौचालयांमध्ये महिला कर्मचारीच नियुक्त करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचंही लोढा यांनी यावेळी सांगितलं.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन देत आहोत.**

****

राज्य शासनाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या मराठी चित्रपट पुरस्कारांचं काल मुंबईत वितरण झालं. या कार्यक्रमात २०२४ चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार गायिका अनुराधा पौडवाल यांना, चित्रपटांसाठीचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार २०२४ अभिनेत्री रोहिणी हट्टगंडी यांना, तर गायनासाठी गायक सुदेश भोसले यांना प्रदान करण्यात आला. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार २०२३ शिवाजी साटम यांना, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार २०२३ दिग्पाल लांजेकर यांना, २०२३ चा स्वर्गीय राज कपूर जीवनगौरव पुरस्कार आशा पारेख यांना तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार एन चंद्रा यांना प्रदान करण्यात आला.

****

ज्येष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांचं काल कर्नाटकात निपाणी इथं निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते. गेल्या पन्नास वर्षांच्या लिखाणानं मराठी साहित्य विश्वात त्यांनी आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं. महाराष्ट्रासह कर्नाटक राज्य सरकारच्या विविध पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं होतं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोरे यांना श्रद्धांजली अर्पण करत, सीमाभागातल्या मराठी भाषिकांसाठी त्यांचं लेखन नंदादीपासारखं तेवत राहील, अशी भावना व्यक्त केली.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथल्या नारायणराव वाघमारे महाविद्यालयात काल आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत नारायणराव वाघमारे महाविद्यालयानं सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. सेनगावच्या तोष्णीवाल महाविद्यालयानं दुसरा तर परभणी जिल्ह्यातल्या राणीसावरगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयानं तिसरा क्रमांक मिळवला.

****

डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त परभणीची अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि ज्ञानोपासक महाविद्यालय यांच्यातर्फे संयुक्तपणे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या पुस्तकांचा लोकार्पण सोहळा काल परभणी इथं पार पडला. वैज्ञानिक दृष्टिकोनातून एकात्मतेची भावना निर्माण करून त्यातून राष्ट्राचा विकास घडवण्याची प्रेरणा नरेंद्र दाभोळकर यांच्या पुस्तकांमधून मिळेल, असा विश्वास प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.दि.भा जोशी यांनी यावेळी व्यक्त केला.

****

कोलकाता इथल्या डॉक्टरवरील अत्याचार आणि हत्येच्या निषेधार्थ काल लातूरमध्ये विद्यार्थ्यांनी कँडल मार्च काढला होता. लातूर शहरातलं ट्यूशन क्लास असोसिएशन, आरसीसी क्लासेस तसंच विविध सामाजिक संघटनांनी मिळून काढलेल्या या मार्च मध्ये बदलापूर घटनेचाही तीर्व निषेध नोंदवण्यात आला.

****

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत २ हजार ८१० उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली असून, ९३ आस्थापनांनी एक हजार ३७३ पदं अधिसूचित केलेली आहेत. आतापर्यंत ९७ उमेदवारांना नियुक्ती पत्रं दिली जाऊन हे सर्व उमेदवार रुजू झाले आहेत. या योजनेत बारावी पास प्रशिक्षणार्थींना सहा हजार रुपये, आयटीआय, पदविकाधारक प्रशिक्षणार्थींना आठ हजार रुपये आणि पदवीधर, पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन मिळणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगरचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेनुसार 'स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल'या प्रकल्पाअंतर्गत, काल हर्सुल इथं मनपा केंद्रीय प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधनानिमित्त, 'मैत्र जीवांचे', हे व्याख्यान घेण्यात आलं. प्राध्यापक ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी या विषयावर मार्गदर्शन केलं.

****